आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – दुपारी १.३० वाजता

४ ऑक्टोबर २०२३ – बुधवार

**ठळक बातम्या**

प्रधानमंत्री उद्या राजस्थान आणि मध्यप्रदेशच्या दौऱ्यावर / विविध पायाभूत सुविधा क्षेत्रातल्या प्रकल्पांची करणार पायाभरणी आणि लोकार्पण

ईशान्येकडच्या राज्यातल्या नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा - एनएलएफटी, आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्स - एटीटीएफ या दोन संघटनांवर केंद्र सरकारची बंदी

अमेरिकन लोकप्रतिनिधीगृहाचे सभापती केवन मॅक्कार्थी पदच्युत

क्रिकेट विश्वचषक स्पर्धा उद्यापासून भारतात रंगणार

**आणि**

आशियाई क्रीडास्पर्धांमधे तिरंदाजीच्या मिश्र गटात भारताच्या ओजस देवतळे आणि ज्योती सुरेखा वेण्णम या जोडीला सुवर्ण पदक

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थानच्या दौऱ्यावर जाणार असून ते जोधपूरला भेट देणार आहेत. यावेळी रस्ते, रेल्वे, विमान वाहतूक, आरोग्य आणि उच्च शिक्षण यासारख्या क्षेत्रातल्या सुमारे पाच हजार कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांची ते पायाभरणी करतील तसंच अनेक प्रकल्पांचं लोकार्पण देखील करणार आहेत. या दौऱ्यात राजस्थानमधल्या आरोग्य आणि पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी विविध महत्त्वाच्या प्रकल्पांची ते पायाभरणी करतील. याअंतर्गत अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, जोधपूर इथलं साडेतीनशे खाटांचं ट्रॉमा सेंटर, क्रिटिकल केअर हॉस्पिटल ब्लॉक आणि

प्रधानमंत्री - आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन अंतर्गत राजस्थानमध्ये विकसित केले जाणारे सात क्रिटिकल केअर ब्लॉक या प्रकल्पांचा समावेश आहे. जोधपूर विमानतळावर अत्याधुनिक अशा नव्या टर्मिनल इमारतीच्या विकासासाठी ते पायाभरणी करतील. अत्याधुनिक संशोधनाला आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी सुमारे एक हजार १३५ कोटी रुपयांहून अधिक खर्च करून विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक आयआयटी अर्थात 'भारतीय तंत्रज्ञान संस्था - जोधपूर परिसर' उभारण्यात आला असून त्याचं देखील यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण केलं जाणार आहे. तसंच राजस्थानमध्ये सुरु होणाऱ्या दोन नवीन रेल्वे सेवांना प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यामध्ये जैसलमेर ते दिल्ली जोडणारी नवीन 'रुनिचा एक्स्प्रेस' आणि मारवाड जंक्शन - खांबळी घाट यांना जोडणाऱ्या 'नवीन हेरिटेज रेल्वेगाडीचा' समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दुपारी मध्य प्रदेशातल्या जबलपूरला भेट देणार आहेत. यावेळी ते रस्ते, रेल्वे, गॅस पाईपलाईन, गृहनिर्माण आणि शुद्ध पिण्याचं पाणी यासारख्या क्षेत्रातल्या सुमारे १२ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या राष्ट्र विकास प्रकल्पांचं लोकार्पण करतील. वैयक्तिक घरगुती नळ जोडण्यांद्वारे सुरक्षित आणि पुरेसं पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्याच्या प्रधानमंत्र्यांच्या संकल्पनेतल्या 'मंडला, जबलपूर आणि दिंडोरी जिल्ह्यात' दोन हजार ३५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक जल

जीवन मिशन प्रकल्पांची पायाभरणी यावेळी केली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

ईशान्येकडच्या राज्यातल्या नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा - एनएलएफटी, आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्स - एटीटीएफ या दोन संघटनांवर केंद्र सरकारनं बंदी घातली आहे. देशविरोधी आणि बेकायदेशीर कृत्य केल्याबद्दल ही बंदी लावण्यात आली असून ती पाच वर्षांसाठी असेल. याबाबत गृहमंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटल आहे की या दोन्ही संघटना आणि त्यांच्याशी संबंधित गटांच्या कारवाया बेकायदेशीर आणि देशाच्या अखंडतेला आणि सर्वभौमत्वाला बाधा आणणाऱ्या आहेत.

<><><><><>

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरु झाली. या वर्षीचा द्वैवार्षिक वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील, आणि नंतर पत्रकारपरिषद घेतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता. सध्या रेपो दर साडेसहा टक्के तर रिव्हर्स रेपो दर तीन पूर्णांक ३५ शतांश टक्के आहे.

<><><><><>

राष्ट्रीय एकलव्य प्रारूप निवासी शाळांच्या चौथ्या सांस्कृतिक, साहित्य आणि कला महोत्सवाला उद्यापासून उत्तराखंडमधे डेहराडून इथं सुरुवात होणार आहे. केंद्रीय आदिवासी विकास मंत्री अर्जुन मुंडा यांच्या हस्ते

महोत्सवाचं उद्घाटन होईल दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात देशभरातून दीड हजारापेक्षा जास्त एकलव्य विद्यालयं या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

अमेरिकेत लोकप्रतिनिधीगृहाचे सभापती केवन मॅकार्थी यांना पदच्युत करण्यत आलं आहे. मॅकार्थींविरोधातला महाभियोग प्रस्ताव २१६ विरुद्ध २१० अशा मत फरकानं मंजूर झाला. मॅकार्थींविरोधात मतदान करणाऱ्यांमधे डेमोक्रॅटिक पक्षाचे २०८ उमेदवार असून ८ रिपब्लिकन पक्षसदस्यही आहेत. फ्लोरिडातले प्रतिनिधी मॅक गेट्झ यांनी हा प्रस्ताव मांडला असून ते उजव्या विचारसरणीचे कडवे पुरस्कर्ते मानले जातात. अमेरिकेत संसदेच्या सभागृह प्रमुखाला सदस्यांनी पदच्युत केल्याचा प्रसंग इतिहासात प्रथमच घडला आहे.

आपण पुन्हा सभापतीपदासाठी इच्छुक नसल्याचं मॅकार्थी यांनी जाहीर केलं असून पुढच्या सभापतींची निवड होईपर्यंत काँग्रेसचं कामकाज स्थगित झालं आहे. येत्या १७ नोव्हेंबर पर्यंत काँग्रेसने अनुदानं मंजूर करणं आवश्यक असून या घडामोडींमुळे संसदीय पेचप्रसंग उद्भवला आहे.

<><><><><>

सामाजिक आणि आर्थिक माहितीवर आधारित जातीनुसार पाहणी २०२२ च्या दुसऱ्या भागाचा अहवाल बिहार विधानसभेसमोर येत्या हिवाळी अधिवेशनात ठेवण्यात येणार आहे. ही माहिती बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी काल पाटण्यात भरलेल्या सर्वपक्षीय बैठकीत दिली. नऊ राजकीय पक्षांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. सतरा विविध मुद्द्यांच्या आधारे ही

पाहणी करण्यात आली ज्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.

**<><><><><>**

'आयसीसी -विश्वचषक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा' उद्यापासून भारतात सुरु होत आहे. याआधी यजमानपदी असताना भारतानं २०११ मध्ये विश्वचषक जिंकला होता. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली यंदाही भारतीय संघ उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास क्रिकेट विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. उद्या दुपारी इंग्लड - न्यूझीलंड संघांमध्ये पहिला सामना खेळला जाणार आहे.

**<><><><><>**

चीन मधे हाँगझू इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज ज्योती सुरेखा वेण्णम आणि ओजस देवतळेने तिरंदाजीत कंपाऊंड मिश्र प्रकारात सुवर्णपदक मिळवलं. रिपब्लिक ऑफ कोरियाच्या जोडीचा त्यांनी १५९-१५८ असा पराभव केला. चालण्याच्या शर्यतीत रामबाबू आणि मंजूराणी यांनी मिश्र रिलेमधे कांस्य पदक मिळवलं तर स्क्वॅशमधे दीपिका पल्लीकल आणि हरिंदर पाल सिंग यांनी हाँगकाँगच्या जोडीचा पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमधे पी व्ही सिंधू आणि एच एस प्रणॉय या दोघांनी एकेरीतले आपापले सामने जिंकून उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. नीरज चोप्रा, अविनाश साबळे आणि लवलीना बोर्गोनहोन आज आपापल्या क्रीडाप्रकारातले पुढचे सामने खेळतील. हॉकी च्या उपांत्य फेरीत भारताच्या पुरुष संघाचा सामना आज कोरियाबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दाखवलेल्या चमकदार कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. आशियाई खेळांमध्ये भारतानं या अगोदरपेक्षा खूपच चांगली कामगिरी केल्याची भावना त्यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे. खेळाबद्दलची निष्ठा, असामान्य धैर्य आणि खिलाडू वृत्ती यांचा संगम भारतीय खेळाडूंमध्ये दिसून आल्या कारणानं भारतानं ७१ पदकांपर्यंत मजल मारल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंत नेहमीच सर्वोत्तम कामगिरी केली असून देशातल्या प्रतिभासंपन्न आणि मेहनती खेळाडूंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ‘ऐतिहासिक क्षण’ भारताला अनुभवायला मिळत आहेत, अशा शब्दात क्रीडामंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी स्पर्धेतल्या यशस्वी खेळाडूंचं कौतुक केलं आहे. यंदाच्या स्पर्धेतले आणखी पाच दिवस बाकी असून भारतीय खेळाडू दैदिप्यमान कामगिरी करतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. २०१८ मध्ये जकार्ता इथं झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला ७० पदकं मिळाली होती. तर हँगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं ७१ सामने जिंकून पदकं पटकावली होती. यंदाच्या 19व्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा येत्या रविवारी समारोप होणार आहे.

**//<><><><>//**

.